नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १८९ | किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

बुधवार, दि. १७ जून २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

थोडक्यात...

बोगस खत कारखान्यावर छापा

अहिल्यानगर (स. गांवकरी) : कृषी विभागाच्या पथकाने नेवासा तालुक्यातील शिंगवेतुकाई एमआयडीसीमधील खताच्या बोगस कारखान्यावर छापा टाकून २१ लाख ८० हजार रुपये किंमतीचा बेकायदेशीर साठा जप्त केला. यासंदर्भात शासनाची फसवणूक केल्याच्या आरोपावरून कंपनीच्या मालकावर सोनई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कृषी विभागाचे जिल्हाध्यक्ष कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी या कारवाईची माहिती दिली. काल, सोमवारी रात्री ९ च्या सुमारास सुरू केलेली कारवाई आज, मंगळवारी पहाटे २.३० पर्यंत सुरू होती. त्यामध्ये वेगवेगळ्या कंपनीच्या नावाने तयार करण्यात आलेले बोगस खताच्या २ हजार ३४ गोण्या जप्त करण्यात आल्या. त्याची किंमत २१ लाख ८० हजार ४८० रुपये आहे. बोगस व अनधिकृत खत निर्मिती करणाऱ्या कारखान्यावरील छाप्यामुळे हंगामाच्या पार्श्वभूमीवर खळबळ उडाली आहे. अधिक तपास सोनई पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक अनिल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुरज मेढे करत आहेत.

४६६ मतदार बजावणार हक्क

परभणी (स. गांवकरी) : परभणी हिंगोली विधान परिषदेसाठी तीन उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असून आता केवळ उमेदवारांच्या हाती दोन दिवस शिल्लक राहिले आहेत. मतदान जवळ आल्यानंतर मतदारांच्या अर्थपूर्ण गाठीभेटींसह आपापले मतदार सुरक्षित करण्याकडे उमेदवारांनी लक्ष केंद्रित केले आहे. महायुतीचे उमेदवार सईद खान, महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. विवेक नावंदर, अपक्ष उमेदवार सुशीलकुमार देशमुख हे तिघे निवडणुकीच्या रिंगणात आहेत. सुरुवातीला स्थानिक पातळीवर महायुती व महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या बैठका पार पडल्या. त्यात आपापल्या उमेदवारांना निवडून आणण्याचे आवाहन करण्यात आले. तथापि थेट मतदारांशी कोणताही उमेदवार संपर्क साधत नसल्याने मतदारांमध्ये अस्वस्थता दिसून येत होती. आता शेवटच्या टप्प्यात उमेदवारांनी गती घेतली आहे. या निवडणुकीत मतांच्या भावाची उघड उघड चर्चा होत असून मतदार तिन्ही उमेदवारांकडून 'अर्थ'पूर्ण भेटीच्या प्रतीक्षेत आहेत. या स्पर्धेत कोणता उमेदवार प्रभावी ठरतो यावरच निवडणुकीचा निकाल अवलंबून आहे.

आरटीओ कर्मचारी बेमुदत संपावर ठाम

मुंबई (स. गांवकरी) : मोटार वाहन विभागातील प्रलंबित मागण्यांवर कोणताही ठोस निर्णय न झाल्याने राज्यभरातील आरटीओ कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप मंगळवारीही सुरू राहिला. प्रशासनाकडून समाधानकारक प्रतिसाद न मिळाल्याने बुधवारीही संप सुरूच ठेवण्याचा निर्णय कर्मचारी संघटनेने घेतला आहे. मोटार वाहन विभाग आरटीओ कर्मचारी संघटनेच्या नेतृत्वाखाली मंगळवारपासून राज्यातील सर्व आरटीओ कार्यालयांतील कर्मचारी बेमुदत संपावर गेले आहेत. संघटनेच्या मते, १५ जून रोजी परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर चर्चा झाली. यापूर्वी ३ जून रोजी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्यासोबत झालेल्या चर्चेचे इतिवृत्तही संघटनेला देण्यात आले. मात्र, आठ प्रमुख मागण्यांबाबत कोणताही ठोस निर्णय अथवा कालबद्ध आश्वासन नसल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. त्यामुळे १६ जूनपासून बेमुदत संप सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

पेरण्यांबाबत मुख्यमंत्र्यांची महत्त्वाची सूचना

पाऊस रखडल्याने मंत्रिमंडळ बैठकीत चिंता

मुंबई : (स. गांवकरी)

मोसमी पावसाची आगेकूच बंद झाली आहे. मोसमी पावसाची वाटचाल २३ जूननंतरच सुरू होण्याचा अंदाज आहे. त्यामुळे पुरेसा पाऊस पडेपर्यंत पेरणी न करण्याचे आवाहन कृषी विभागाने करावे. तुर्तास पिण्याच्या पाण्याची टंचाई भासत नाही. मात्र, कमी पावसाची शक्यता असल्यामुळे हंगामात पडणाऱ्या पावसाचे पाणी प्राधान्याने पिण्यासाठी राखीव ठेवा. ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्यासाठी पाणी पुरेल, असे नियोजन करा, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळ बैठकीत संबंधित विभागाला दिल्या.

मोसमी पावसाची आगेकूच थांबल्याचे पडसाद राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवारी झालेल्या बैठकीत उमटले. कृषी, आपत्ती व्यवस्थापन व मदत पुनर्वसन आणि जलसंपदा विभागाच्या वतीने बैठकीत माहितीचे सादरीकरण करण्यात आले.

पावसाअभावी सर्व प्रकारच्या पेरण्या रखडल्या आहेत. राज्याच्या काही भागांत होणाऱ्या धूळपेरण्याही थांबल्या आहेत. मंगळवारअखेर सरासरी एक टक्का पेरणी झाली आहे, अशी माहिती कृषी विभागाने दिली. मोसमी पाऊस सिंधूदुर्ग, रत्नागिरी, कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यात दाखल झाला असला तरीही पावसात पुरेसा जोर नाही. उत्तरेकडील उष्ण वाऱ्यांमुळे मोसमी पावसाची आगेकूच थांबली आहे. पाच दिवसांनंतर मोसमी वाऱ्याच्या प्रगतीला पोषक वातावरण निर्माण होऊन, २३ जून नंतरच राज्यात पावसाची आगेकूच सुरू होईल. राज्यातील धरणांमध्ये पाणीसाठा अपुरा असल्याने पाणी जपून वापरण्याची गरज आहे. राज्यातील मोठ्या धरणांत २४ टक्के पाणीसाठा आहे. मध्यम प्रकल्पात ३१ टक्के आणि लघु प्रकल्पात २३ टक्के, असा एकूण २५ टक्के पाणीसाठा आहे. उजनी धरणाने तळ गाठला असून, पाणीसाठी शून्यावर गेला आहे. कोयनेत ९ टक्के, जायकवाडीत २९ टक्के, भातसा ३२ टक्के, गोसेखुर्द ३४ टक्के, खडकवासला धरण साखळीत१७ टक्के, अप्पर वर्धा ४४ टक्के, अप्पर वैतरणा ३६, भंडारदरा धरणात १९ टक्के पाणीसाठा असल्याचे जलसंपदा विभागाने सांगितले.

विदर्भ, मुंबईला तुर्तास पाणी दिलासा

उजनी धरणाच्या पाण्याने तळगाठला असला तरीही विदर्भ आणि मुंबईला तुर्तास पाणी टंचाईची भीती नाही. मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या भातसा धरणात ३२ टक्के तर अप्पर वैतरणा धरणात ३६ टक्के पाणीसाठा आहे. विदर्भातील पेंच समूह प्रकल्पात तब्बल ५२ टक्के, इसापूर धरणात ४३ टक्के, अप्पर वर्धा धरणात ४४ टक्के आणि गोसीखुर्द धरणात ३४ टक्के पाणीसाठा आहे. त्यामुळे तुर्तास विदर्भ आणि मुंबईला पाणी दिलासा मिळाला आहे. कोयना धरणात नऊ टक्के, जायकवाडीत २९ टक्के पाणीसाठा आहे.

धरणांतील पाणीसाठा (टक्के)
मोठे प्रकल्प – २४
मध्यम प्रकल्प – ३१
लघु प्रकल्प – २३
एकूण पाणीसाठा – २५ टक्के

कृषी, आपत्ती व्यवस्थापन आणि जलसंपदा विभागाच्या सादरीकरणानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यंदाच्या पावसाळ्यावर एल निनोचे संकट आहे. कमी पावसाची शक्यता असल्यामुळे पावसाळ्यात पडलेल्या पाण्याचे काटेकोर नियोजन करा. सध्या पिण्याच्या पाण्याची टंचाई नसली तरीही पुढील वर्षी उन्हाळ्यात टंचाई जाणवेल, त्यामुळे ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्यासाठीच्या पाण्याचे नियोजन करा, अशा सूचना फडणवीस यांनी संबंधित विभागाला दिल्या आहेत.

संस्कार अन् शिवभक्तीचा सुवर्णयोग!

सोमवती अमावस्येला शिवनाम गजर

कराड : (स. गांवकरी)



कृष्णा- कोयना नद्यांच्या अपूर्व प्रीतिसंगमावरील आणि दक्षिण काशी म्हणून ओळख असलेल्या कराडनगरीत वीरशैव लिंगायत समाजाचा सामुदायिक इष्टलिंग पूजा व आशीर्वचन सोहळा भक्तीमय वातावरणात उत्साहात संपन्न झाला. संस्कार आणि शिवभक्तीचा अपूर्व संगम घडवणाऱ्या या सोहळ्याला केदारपीठाचे जगद्गुरु भीमाशंकरलिंग शिवाचार्य महास्वामींसह चार प्रमुख शिवाचार्यांची उपस्थिती लाभली.

कराडच्या पवित्र भूमीला धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक समृद्धतेची प्रदीर्घ परंपरा आहे. याच परंपरेचे सोनेरी पान या सोहळ्याच्या निमित्ताने जोडले गेले. अधिक मासाची सांगता आणि सोमवती अमावस्या असा दुर्मिळ सुवर्णयोग जुळून आल्यामुळे कृष्णा- कोयनेच्या प्रीतिसंगमावर शिवभक्तांचा उत्साह ओसंडून वाहत होता. नव्या पिढीला सनातन तत्त्वज्ञान, उच्च संस्कार आणि आचार-विचारांची ओळख करून देणारा हा सोहळा सामाजिक ऐकोप्याचे उत्तम उदाहरण ठरले.

केदारपीठाचे जगद्गुरु महास्वामी म्हणाले, "रुद्राक्ष धारण करणे आणि श्रद्धेने इष्टलिंगाची पूजा करणे ही शिवतत्त्वाशी जोडली जाणारी आत्मिक प्रक्रिया आहे. इष्टलिंग हा केवळ बाह्य दागिना नसून, तो जिवाचा शिवाशी थेट संवाद साधणारा जिवंत दुवा आहे." मानवी शरीर हेच एक ब्रह्मांड असल्याची जाणीव शरीरावर लावलेले भस्म करून देते, असे सांगत, त्यांनी भस्माच्या आध्यात्मिक पैलूवर प्रकाश टाकला. शरीरावर लावलेले भस्म हे मानवी शरीरच एक ब्रह्मांड असल्याची जाणीव करून देणारे श्रेष्ठ तत्त्वज्ञान आहे.

भस्माला आध्यात्मिक महत्त्व

डॉ. शिवयोगी शिवाचार्य म्हैसाळकर यांनी आत्मशुद्धी आणि सामाजिक समतेचा संदेश दिला. ते म्हणाले, "माणूस आयुष्यात संपत्ती आणि कीर्ती मिळवू शकतो; मात्र अंतिम प्रवासात केवळ त्याचे संस्कार आणि शिवभक्तीच सोबत राहते. वीरशैव लिंगायत धर्मातील इष्टलिंग पूजा ही वैयक्तिक विधी नसून, समाजमनात समता, श्रमप्रतिष्ठा आणि आत्मीयतेची भावना रुजवणारी सामाजिक चळवळ आहे".

इंटरनेट सेवा सक्षम करण्यासाठी राज्य सरकारची स्वतंत्र कंपनी

मुंबई : (स. गांवकरी)

राज्यातील प्रत्येक गावाच्या ग्रामपंचायत स्तरापर्यंत ऑप्टिकल फायबरद्वारे उच्च गतीची सक्षम व दर्जेदार ब्रॉडबँण्ड सेवा उभी करण्यासाठी सरकारने 'महानेट डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड(एमडीआयएल) विशेष हेतू कंपनी स्थापन करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. देशातील ग्रामीण भागात उच्च दर्जाची इंटरनेट सेवा प्राप्त व्हावी आणि शहरी व ग्रामीण भागात असलेली डिजिटल दरी दूर करण्यासाठी केंद्र सरकारने बीबीएनएल व बीएसएनएलच्या माध्यमातून भारत नेट टप्पा क्रमांक एक राबविला. सुधारित भारतनेट टप्पा क्रमांक दोन कार्यक्रम केंद्र सरकारकडून सर्व ग्रामपंचायती आणि ग्रामीण घरांपर्यंत उच्च गतीचे ब्रॉडबँण्ड सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राबविण्यात येत आहे. त्यासाठी केंद्र सरकारच्या सूचनेनुसार केंद्र व राज्य शासनाचे सम प्रमाणात प्रतिनिधीत्व असणारी विशेष हेतू कंपनी स्थापन करण्यात येत आहे. भारतनेट टप्पा क्रमांक एक व दोन मध्ये अस्तित्वात असलेले नेटवर्क सद्यस्थितीत या विशेष हेतू कंपनीकडे हस्तांतरीत करण्यात येणार आहे. पहिल्या टप्यातील ऑप्टीकल फायबर टाकताना उद्भवलेले किंवा प्रलंबित असलेले वाद, खटले व त्यातील आर्थिक दायित्त्व मात्र या नवीन कंपनीवर राहणार नाही, असा निर्णय घेण्यात आला आहे.

भारतनेट टप्पा क्रमांक एकद्वारे आतापर्यंत राज्यातील सुमारे ८५३ ग्रामपंचायतीमध्ये डिजिटल कनेक्टिव्हिटी स्थापन करण्यात आली आहे. त्याद्वारे ई-शासन सेवा देण्यात येत आहेत.

'ऑपरेशन टायगर' साठी नांदेडहून उड्डाणे !

छत्रपती संभाजीनगर : (स. गांवकरी)

'ऑपरेशन टायगर' मध्ये मराठवाड्यातून संजय जाधव यांच्याबरोबर धाराशिवचे खासदार ओम राजेनिंबाळकर हेही सहभागी होतील. पवन राजेनिंबाळकर यांच्या निकाल २० जून रोजी लागणार असून त्यानंतर ते शिवसेनेच्या शिंदे गटात सहभागी होतील, असे सांगण्यात येत आहे. त्यामुळे ऑपरेशन टायगर नावाने ठाकरे यांची शिवसेना फोडण्याचा प्रयत्न पुढील दोन किंवा तीन दिवसात पूर्णत्वास येईल. दरम्यान नांदेडहून एका विशेष विमानाने संजय जाधव आणि यवतमाळचे आमदार दिल्ली रवाना झाले आहेत.

गेल्या दीड वर्षापासून ठाकरे यांचा पक्ष पुन्हा एकदा फुटेल, असे सांगण्यात येत होते. मात्र, नारीशक्ती विधेयक नामंजूर झाल्यानंतर केंद्रीय पातळीवरुन फोडाफोडीच्या राजकारणाला पुन्हा सुरुवात झाली होती. जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीनंतर ठाकरे यांच्या सेनेतील एक गट पुन्हा फुटेल अशी चर्चा सुरू होती. यामध्ये संजय जाधव यांनी तर पूर्वीच जाहीरपणे एकनाथ शिंदे यांच्यासमवेत जाण्याचे जाहीर केले होते. मराठवाड्यातून ओम राजेनिंबाळकर यांच्या नावावर वारंवार प्रश्नचिन्ह लावले जात होते.

स्थानिक पातळीवर भाजपचे आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांच्याशी असणाऱ्या राजकीय संघर्षाच्या पार्श्वभूमीवर ते ठाकरे यांच्याबरोबर राहतील असे सांगण्यात येत होते. शिवाय पहिल्या फुटीच्या वेळी ओम राजेनिंबाळकर आणि आमदार कैलास पाटील यांनी ' निष्ठावंत ' अशी प्रतिमा कमावली होती. मात्र, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीमध्ये दणदणीत पराभव झाल्यानंतर ओम राजेनिंबाळकरांचा संभ्रम वाढला होता. याच काळात पवन राजेनिंबाळकर हत्येचा निकाल लागेल अशी शक्यता होती.

मराठवाड्यातून संजय जाधव आणि ओम राजेनिंबाळकरांचे नाव

मुंबई सत्र न्यायालयाने २० जून रोजी निकल वाचन केले जाईल असे सांगितले. या निकालानंतर ओम राजेनिंबाळकर शिंदेसेनेमध्ये जाण्याच्या तयारीत असल्याचे सांगण्यात येते. शिवसेनेच्या ठाकरे गटातील सहा खासदारांची नावेही गट म्हणून पुढे येऊ लागली आहेत. यात मराठवाड्यातील तीन खासदार असतील असे सांगण्यात येत आहे. नागेश पाटील आष्टीकर यांचे नाव चर्चेत आहे. संसेदेमध्ये तीन चतुर्थ्यांश मते भाजपच्या बाजूने असावीत म्हणून सुरू असणाऱ्या फोडाफोडीच्या खेळाला आता वेग आला आहे. विरोधात राहून मतदारांची कामे पूर्णत्वास येत नाहीत, त्यासाठी लागणारा निधी मिळाला तर अधिक सोयीने राजकारण करता येईल, असा युक्तीवाद केला जात आहे. मात्र, मराठवाड्यातील तीन खासदार शिवसेनेच्या शिंदे गटास हाती लागतील, असे चित्र आहे.

आरटीआय नियमांत मोठे बदल!

'माहितीचा अधिकार नियम, २०२६' अधिसूचित; शुल्कवाढ, फक्त पेन्सिल आणि...

वर्धा : (स. गांवकरी)

महाराष्ट्र शासनाने माहितीचा अधिकार (RTI) अधिनियमांतर्गत असणाऱ्या जुन्या नियमांचे अधिक्रमण करून राज्यात नवे 'महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६' लागू केले आहेत. सामान्य प्रशासन विभागाने १२ जून २०२६ रोजीच्या असाधारण राजपत्रात यासंबंधीची अधिकृत अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. नवीन नियमांनुसार अर्ज शुल्कात वाढ करण्यात आली असून, पारदर्शकता वाढवण्यासाठी आणि अर्जांचा गैरवापर रोखण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण तरतुदी आणि मर्यादा घालण्यात आल्या आहेत.

नवीन नियमांनुसार, आता माहिती मिळवण्यासाठी सामान्य नागरिकांना जोडपत्र "अ" मधील विहित नमुन्यात ३० रुपये अर्ज शुल्क सादर करावे लागेल. यापूर्वी हे शुल्क कमी होते. माहिती पुरविण्याच्या दरांमध्येही सुधारणा करण्यात आली आहे. छायाप्रती व डिजिटल प्रती: ए-४ किंवा त्यापेक्षा लहान आकाराच्या प्रतिसाठी, तसेच डिजिटल/स्कॅन प्रतींच्या प्रत्येक पृष्ठासाठी ५ रुपये शुल्क आकारले जाईल. कार्यालयात जाऊन मूळ कागदपत्रांची तपासणी (निरीक्षण) करताना पहिल्या एका तासासाठी कोणतेही शुल्क असणार नाही, मात्र त्यानंतरच्या प्रत्येक तासासाठी किंवा त्याच्या भागासाठी ५० रुपये शुल्क मोजावे लागेल. टपाल खर्च: माहिती पाठवण्यासाठी ५० रुपये किंवा त्यापेक्षा जास्त असणारा प्रत्यक्ष टपाल खर्च अर्जदाराकडून घेतला जाईल.

रोख रक्कम, न्यायालय शुल्क मुद्रांक (कोर्ट फी स्टॅम्प), डिमांड ड्राफ्ट व्यतिरिक्त आता ऑनलाईन आरटीआय अर्जांसाठी युपीआय (UPI) आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा पर्याय खुला करण्यात आला आहे. दारिद्र्यरेषेखालील नागरिकांना अर्ज आणि माहिती शुल्कातून सूट देण्यात आली आहे. मात्र, जर मागितलेली माहिती खूप मोठ्या स्वरूपाची (विपुल) असेल, तर पहिली ५० पृष्ठे विनाव्यत्यय मोफत दिली जातील आणि त्यापुढील पृष्ठांसाठी विहित दराने शुल्क आकारले जाईल. अर्जांचा गैरवापर टाळण्यासाठी आणि प्रशासकीय सुलभतेसाठी शासनाने महत्त्वाचा नियम आणला आहे. आता आरटीआय अंतर्गत केलेला लेखी अर्ज केवळ एकाच विषयाशी संबंधित असावा आणि तो साधारणपणे १५० शब्दांपेक्षा जास्त नसावा. एकापेक्षा जास्त विषयांवर माहिती हवी असल्यास स्वतंत्र अर्ज करावे लागतील. जर एकाच अर्जात अनेक विषय असतील, तर जन माहिती अधिकारी केवळ पहिल्या विषयाची माहिती देईल आणि इतर विषयांसाठी स्वतंत्र अर्ज करण्याचा सल्ला देईल. नवीन नियमांनुसार, प्रत्येक अर्जदाराने अर्जासोबत नागरिकत्व सिद्ध करणारा स्वतः साक्षांकित (Self-Attested) छायाचित्र असलेला ओळखपुरावा जोडणे बंधनकारक आहे. ओळखपुराव्याशिवाय आलेले अर्ज अधिकारी परत करू शकतील. तसेच, कार्यालयात कागदपत्रांचे निरीक्षण करताना अर्जदाराला केवळ पेन्सिल वापरण्याची मुभा असेल.

रोहित पवारांच्या उपोषणस्थळी भाजपचे शुद्धीकरण आंदोलन

पंढरपूर : (स. गांवकरी)

■ पवार गटाचेही प्रतिआंदोलन

रोहित पवार यांनी पंढरपूर येथे केलेले उपोषण हे प्रसिद्धीसाठी स्टंटबाजी असल्याचा आरोप करत भाजपच्या कार्यकर्त्यांनी उपोषणस्थळी गोमूत्र आणि चंद्रभागेचे पाणी शिंपडून शुद्धीकरण आंदोलन केले. दरम्यान शरद पवार गटाकडूनही प्रतिआंदोलन करत या घटनेचा निषेध करण्यात आला. आमदार रोहित पवार यांनी पंढरपुरात नुकतेच शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर उपोषण केले. मंत्री गिरीश महाजन यांच्या मध्यस्थीनंतर त्यांनी त्यांचे उपोषण रविवारी स्थगित केले. दरम्यान हे उपोषण म्हणजे केवळ एक प्रसिद्धीसाठी स्टंटबाजी असल्याचा आरोप करत मंगळवारी भाजपच्या किसान मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी उपोषणस्थळी गोमूत्र आणि चंद्रभागेचे पाणी शिंपडून शुद्धीकरण आंदोलन केले. आमदार पवार यांना शेतकऱ्यांविषयी कोणताही कळवळा नाही. आजवर कधीही त्यांच्या प्रश्नांवर न बोलणारे पवार सध्या अन्य प्रकरणांप्रमाणेच या विषयावरही राजकारण करत स्टंटबाजी करत असल्याचा आरोप या वेळी किसान मोर्चाचे माउली हळणवर यांनी केला. तसेच आचारसंहिता लागू असताना आंदोलन केल्याप्रकरणी पवार यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणीही हळणवर यांनी प्रांताधिकाऱ्यांकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. दरम्यान शरद पवार गटाकडूनही प्रतिआंदोलन करत या घटनेचा निषेध केला. यावेळी त्यांनी भाजपविरोधात घोषणाबाजी केली.

थोडक्यात पण महत्वाचे

फार्मसिस्ट सक्तीची तात्काळ अंमलबजावणी करा : साक्षी मढवी

ठाणे (स. गांवकरी) : दिवा शहरातील मेडिकल स्टोअरमध्ये फार्मसिस्ट सक्तीच्या नियमाची प्रभावी अंमलबजावणी होत आहे की नाही याची ठाणे महानगरपालिकेने तात्काळ पाहणी करावी असा प्रस्ताव नगरसेविका साक्षी मढवी यांनी आगामी महासभेत मांडला आहे. शिवसेना शहरप्रमुख, नगरसेवक रमाकांत मढवी यांनी दिवा शहरातील बोगस डॉक्टरांचा विषय महासभेत घेतल्यानंतर येणाऱ्या आगामी महासभेत नगरसेविका साक्षी मढवी यांनी दिवा शहरातील औषध विक्रीचा विषय चर्चेला आणला आहे. औषध विक्री हा नागरिकांच्या आरोग्याशी थेट संबंधित विषय असून प्रत्येक मेडिकल स्टोअरमध्ये पात्र आणि नोंदणीकृत फार्मसिस्ट उपस्थित असणे कायद्याने बंधनकारक आहे. मात्र दिवा शहरातील अनेक औषध विक्री केंद्रांमध्ये या नियमाचे काटेकोर पालन होत आहे की नाही याबाबत नागरिकांमध्ये शंका व्यक्त केली जात आहे. काही ठिकाणी फार्मसिस्टच्या अनुपस्थितीत औषध विक्री होत असल्याच्या तक्रारी देखील समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर नगरसेविका साक्षी मढवी यांनी महासभेत प्रस्ताव मांडत संबंधित विभागामार्फत विशेष तपासणी मोहीम राबविण्याची मागणी केली आहे. तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या मेडिकल स्टोअर्सवर आवश्यक ती कारवाई करण्यात यावी, अशीही मागणी त्यांनी केली.

नगर-कल्याण रोडवर खळबळ; मध्यरात्री रक्तरंजित हल्ला

अहिल्यानगर (स. गांवकरी) : नगर-कल्याण रोड परिसरातील जाधव मळा भागात अज्ञात इसमाने झोपेत असलेल्या तरुणावर कुऱ्हाडीने वार करून निर्घृण हत्या केल्याची घटना समोर आली आहे. या भीषण हल्ल्यात त्याची पत्नी देखील गंभीर जखमी झाली आहे. लक्ष्मण उर्फ लक्ष्या मार्तंड काळे (वय ३०) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. याबाबत रुपाली लक्ष्मण काळे (वय २८, रा. मुळचे काळेगाव, ता. शेवगाव) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी आणि त्यांचे पती लक्ष्मण काळे हे मुळचे शेवगाव तालुक्यातील असून कामानिमित्त नगर-कल्याण रोडवरील जाधव मळा येथील एका शेडमध्ये वास्तव्यास होते. दोघे पती-पत्नी झोपेत असताना १६ जून रोजी पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास अज्ञात इसमाने झोपेत असलेल्या लक्ष्मण काळे यांच्या तोंडावर कुऱ्हाडीने वार करून त्यांची हत्या केली. एवढेच नव्हे तर, हल्लेखोराने फिर्यादी रुपाली काळे यांच्यावरही जीवघेणा हल्ला केला. रुपाली काळे गंभीर जखमी असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा प्रवेशोत्सव उत्साहात संपन्न

शिवनेरी (स. गांवकरी) : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आंबोली येथे इयत्ता पहिलीच्या नवागत विद्यार्थ्यांचे प्रवेशोत्सव व स्वागत सुशोभीत केलेल्या ट्रॅक्टर मधून सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. गावामध्ये ढोल ताशांच्या व लेझीमच्या साथीने इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचे मिरवणुकीने काढण्यात आली . विद्यार्थ्यांचे पहिले पाऊल आज शाळेत पडणार म्हणून पावलांचे ठसे घेऊन स्वागत झाले. माजी विस्ताराधिकारी निवृत्ती खुटाण यांनी विद्यार्थ्यांना शाल गुलाबपुष्प व इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांना स्कूल बॅग व शैक्षणिक साहित्य वाटप केले. शालेय सर्व विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी मुख्याध्यापक शिवाजी भालचिम होते.

ओम साई सेवा मंडळ कुमशेत यांच्यावतीने ६० डझन वह्या वाटप

शिवनेरी (स. गांवकरी) : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुमशेत येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रारंभानिमित्त ओमसाई सेवा मंडळ, कुमशेत यांच्या वतीने इयत्ता पहिली ते चौथीच्या सर्व विद्यार्थ्यांना ६० डझन वह्यांचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात गावातून प्रभातफेरी काढून करण्यात आली. नवागत विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प, फेटा बांधून व वाजत-गाजत स्वागत करण्यात आले. यावर्षी इयत्ता पहिलीत १३ तर इयत्ता दुसरीत २ विद्यार्थ्यांचा नव्याने प्रवेश झाला. यावेळी विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके , गणवेशांचे वाटप व शैक्षणिक साहित्य देण्यात आले. पंचायत समिती सदस्या उल्का मोरे, सरपंच रवींद्र डोके ,पत्रकार राजेश डोके व इतर मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले.

शाळेच्या पहिल्या दिवशी १५२ विद्यार्थी; विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत

आदिवासी कातकरी मुला-मुलींची अनुदानित आश्रमशाळेत बाबरे येथे प्रवेशोत्सव उत्साहात संपन्न

शहापूर : (स. गांवकरी)

ए.बी.एम. समाज प्रबोधन संस्था संचलित आदिवासी कातकरी मुला-मुलींची अनुदानित आश्रमशाळा, बाबरे येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ चा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. स्वागतगीत सादर करून उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. शाळेच्या मुख्याध्यापिका आशा रणखांबे यांनी प्रवेशोत्सवास प्रमुख उपस्थिती लाभलेले आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर येथील प्रतिनिधी सी. आर. सोनावणे (गृहपाल, खर्डी), संस्थेच्या माध्यमिक विभागाच्या चेअरमन पूनम भडांगे, प्राथमिक विभागाचे कार्यकारी चेअरमन संतोष पडवळ तसेच जीवनसंघर्षकार, साहित्यिक नवनाथ रणखांबे यांचे स्वागत केले.

यावेळी नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प व पाठ्यपुस्तके देऊन स्वागत करण्यात आले. प्रवेशोत्सवाच्याच दिवशी एकूण १५२ विद्यार्थी शाळेत दाखल झाले असून त्यांचे ढोल-ताशांच्या गजरात पारंपरिक पद्धतीने जल्लोषात स्वागत करण्यात आले. नवीन शाळा, नवीन मित्र आणि नवीन शैक्षणिक प्रवासाबद्दल विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह दिसून आला. मुख्याध्यापिका आशा रणखांबे यांनी प्रास्ताविकातून शाळेतील विविध सुविधा, शैक्षणिक उपक्रम आणि शिस्तीचे नियम यांची माहिती दिली. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना नव्या शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा देत उज्ज्वल भवितव्याच्या शुभेच्छा व्यक्त केल्या. विद्यार्थ्यांसाठी विशेष आकर्षण म्हणून शाळेत 'सेल्फी पॉईंट' उभारण्यात आला होता. नवीन गणवेशात व हातात पाठ्यपुस्तके घेऊन विद्यार्थ्यांनी उत्साहाने सेल्फी काढत शाळेच्या पहिल्या दिवसाच्या आठवणी जतन केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माध्यमिक शिक्षिका सुप्रिया भोईर यांनी केले. प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक कपिल सातपुते यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना मिष्ठान्न वाटप करण्यात आले. प्रवेशोत्सवामुळे संपूर्ण आश्रमशाळा परिसर आनंद, उत्साह आणि नव्या शैक्षणिक उमेदीने भारावून गेला होता.

पार्सल देण्यास नकार दिल्याचा राग; टोळक्याचा हल्ला

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

पार्सल मागविल्यानंतर ते दुकानापर्यंत आणून देण्यास नकार दिल्याच्या किरकोळ कारणावरून पावभाजी व बिर्याणी विक्रेत्या दोन भावांना चार ते पाच जणांच्या टोळक्याने मारहाण केल्याची घटना रविवारी (१४ जून) सायंकाळी अहिल्यानगर-पुणे रस्त्यावरील उच्छल कॉम्प्लेक्ससमोर घडली.

या हल्ल्यात अनिस शेख (रा. बुरूडगाव रस्ता) हा जखमी झाला असून त्याच्यावर जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

दुसरा जखमी अलीम जाफर शेख (वय ४०, रा. बुरूडगाव रस्ता) यांच्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात चार ते पाच अनोळखी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी अलीम शेख यांचा उच्छल कॉम्प्लेक्ससमोर अल्पना पावभाजी तर त्यांचे भाऊ अनिस शेख यांचा शाही बिर्याणी नावाचा हातगाडी व्यवसाय आहे.

रविवारी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास दोघेही नेहमीप्रमाणे व्यवसाय करत असताना उच्छल कॉम्प्लेक्समधील एका खासगी आस्थापनात काम करणारा तोंडओळखीचा व्यक्ती त्यांच्या गाडीवर आला. त्याने कॉम्प्लेक्सच्या मागील बाजूस पुलावचे पार्सल आणून देण्याची मागणी केली. व्यवसाय सुरू असल्याने दुकान सोडून पार्सल देण्यासाठी जाणे शक्य नसल्याचे सांगत अलीम शेख यांनी त्यास नकार दिला. याचा राग मनात धरून संबंधित व्यक्ती काही वेळाने आणखी तीन ते चार जणांना घेऊन हातगाडीवर परत आला. यावेळी 'तुम्ही आम्हाला पार्सल का दिले नाही, तुम्हाला येथे धंदा करू देत नाही', अशी धमकी देत टोळक्याने दोन्ही भावांना शिवीगाळ केली. दोन्ही भावांनी शांततेने समजावून सांगण्याचा प्रयत्न केला.

येरवडा खुले कारागृहात प्रासादिक कीर्तन सोहळा

संत विचारांनी बंदी झाले मंत्रमुग्ध : कीर्तनातून बंद्यांच्या मनपरिवर्तनाचा संदेश

पुणे (स. गांवकरी)

कारागृहातील बंद्यांच्या मानसिक परिवर्तनासह त्यांच्या पुनर्वसनाला चालना देण्याच्या उद्देशाने येरवडा खुले जिल्हा कारागृहात सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन आणि वै. मामासाहेब दांडेकर वारकरी सेवा संघ, आळंदी यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य प्रासादिक कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्यास बंद्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कारागृह विभागाच्या 'सुधारणा व पुनर्वसन' या ब्रीदवाक्यानुसार बंद्यांमध्ये सकारात्मक विचार रुजावेत आणि त्यांचे सामाजिक पुनर्स्थापन सुलभ व्हावे यासाठी विविध सांस्कृतिक, सामाजिक, प्रबोधनात्मक आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. त्याचाच एक भाग म्हणून क्रांतिकारक कीर्तनकार ह.भ.प. निलेश महाराज झरेगावकर यांचे

प्रासादिक कीर्तन आयोजित करण्यात आले.

आपल्या ओघवत्या आणि रसाळ वाणीतून निलेश महाराजांनी संत परंपरा, भगवान श्रीकृष्ण, प्रभू श्रीराम, संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज, संत नामदेव महाराज तसेच वाल्मिकी ऋषी यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंगांचा दाखला देत मानवी जीवनाचे महत्त्व, चुका सुधारण्याची संधी आणि सद्गुणांचा अंगीकार करण्याची गरज याविषयी मार्गदर्शन केले. कीर्तनादरम्यान ज्ञानोबा-तुकारामांच्या गजराने संपूर्ण कारागृह परिसर दुमदुमून गेला आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी येरवडा खुले कारागृहाचे अधीक्षक शामकांत शेडगे यांनी संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील ओव्यांचा उल्लेख करत कीर्तनाच्या संदेशाचे सार मांडले. कारागृहातील बंद्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच त्यांच्या मानसिक स्वास्थ्यासाठी अशा अध्यात्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची मोठी आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमात सुमारे १५० बंद्यांनी सहभाग नोंदविला. हा उपक्रम अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य डॉ. सुहास वारके यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आला. विशेष कारागृह महानिरीक्षक योगेश देसाई आणि कारागृह उपमहानिरीक्षक (पश्चिम विभाग) सुनील ढमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वरिष्ठ तुरुंगाधिकारी नागेश कांबळे, तुरुंग अधिकारी नागनाथ भानवसे यांच्यासह कारागृहातील अधिकारी, कर्मचारी आणि बंदी बांधवांनी विशेष परिश्रम घेतले.

सॅन होजेत मराठी संस्कृतीचा जागतिक जल्लोष

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची "NAFA 2026" फिल्म फेस्टिव्हलला उपस्थितीची ग्वाही

मुंबई : (स. गांवकरी)

नॉर्थ अमेरिकन फिल्म असोशिएशन (NAFA)चे संस्थापक अध्यक्ष, प्रख्यात उद्योगपती, राष्ट्रीय सुवर्ण कमळ पुरस्कार विजेते तसेच 'देऊळ' आणि 'भारतीय' या लोकप्रिय मराठी चित्रपटांचे नामवंत निर्माते अभिजीत घोलप यांनी आज महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेत त्यांना कॅलिफोर्नियातील सॅन होजे येथे ७ ते ९ ऑगस्ट २०२६ दरम्यान आयोजित करण्यात येणाऱ्या तिसऱ्या नॉर्थ अमेरिकन फिल्म फेस्टिव्हल (NAFA Film Festival 2026) चे निमंत्रण दिले.

या भेटीदरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी NAFAच्या विविध उपक्रमांचे विशेष कौतुक केले. तसेच "NAFA Film Festival 2026" मध्ये उपस्थित राहण्याचे आश्वासन देत या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी एबीपी माझाच्या संपादक सरिता कौशिक, अभिजीत घोलप तसेच डॉ. गौरी घोलप उपस्थित होत्या. उत्तर अमेरिकेतील मराठी आणि भारतीय समुदायासाठी NAFA फिल्म फेस्टिव्हल हा प्रतिष्ठेचा सांस्कृतिक चित्रपट महोत्सव बनला असून दरवर्षी भारतातील अनेक मान्यवर कलाकार, निर्माते, दिग्दर्शक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील दिग्गज व्यक्तिमत्त्वे या महोत्सवात सहभागी होतात. गतवर्षी महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी विशेष उपस्थिती दर्शवली होती.

यावर्षीच्या महोत्सवात ज्येष्ठ अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी, अभिनेते-दिग्दर्शक महेश कोठारे, दिग्दर्शक महेश मांजरेकर, राष्ट्रीय पुरस्कार विजेते दिग्दर्शक नागराज मंजुळे, गीतकार गुरू ठाकूर, अभिनेत्री श्रुती मराठे, अभिनेत्री गिरिजा ओक यांच्यासह अनेक नामवंत कलाकार उपस्थित राहणार आहेत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी NAFA Stream OTT या उपक्रमाचे कौतुक करताना म्हटले की, "परदेशात राहणाऱ्या मराठी बांधवांसाठी असे व्यासपीठ उपलब्ध होणे ही अत्यंत स्वागतार्ह बाब आहे. NAFA Stream OTT मुळे महाराष्ट्रातील चित्रपट निर्मात्यांना त्यांच्या कलाकृती आंतरराष्ट्रीय स्तरावर सादर करण्याची मोठी संधी मिळेल. यामुळे मराठी चित्रपटसृष्टीचा जागतिक प्रेक्षकवर्ग अधिक व्यापक होण्यास मदत होईल." यावेळी बोलताना NAFAचे संस्थापक अध्यक्ष अभिजीत घोलप म्हणाले, "NAFA Film Festival हा केवळ चित्रपटांचा महोत्सव नसून भारतीय संस्कृती, मराठी अस्मिता आणि जागतिक स्तरावरील कलावंतांना जोडणारा एक सशक्त सांस्कृतिक मंच बनला आहे. महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांनी आमच्या निमंत्रणाचा सन्मान करून उपस्थित राहण्याची सकारात्मक भूमिका दर्शवली, ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे.

जमीन व्यवहारात डॉक्टरची १४ कोटींची फसवणूक

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

जमीन खरेदी-विक्रीच्या व्यवहारात सावेडी येथील डॉक्टरची तब्बल १४ कोटी ६६ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी मुख्य संशयित आरोपीला येथील आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केली. अमोल बबन जाधव (वय ४०, रा. मोरगव्हाण, ता. नेवासा) असे त्याचे नाव आहे. त्याला सोमवारी (१५ जून) येथील प्रथम वर्ग न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने पाच दिवसांची (२० जूनपर्यंत) पोलीस कोठडी सुनावली आहे. डॉ. अनिल सूर्यभान आठरे (वय ७३, रा. झोपडी कॅन्टीन, सावेडी) असे फसवणूक झालेल्या डॉक्टरचे नाव आहे. त्यांनी ८ नोव्हेंबर २०२५ रोजी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून ३० जणांच्या टोळीविरोधात कटकारस्थान रचून फसवणूक केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदरचा गुन्हा तपासकामी आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला आहे. या गुन्ह्यातील मुख्य संशयित अमोल जाधव हा गुन्हा दाखल झाल्यापासून पसार होता. तो एमआयडीसी परिसरात असल्याची माहिती आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांच्या पथकाने जाधव याला एमआयडीसी परिसरातून ताब्यात घेतले. त्याला अटक करण्यात आली असून त्याच्याकडे चौकशी सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुख्य संशयित आरोपी भाजपाचा माजी नगरसेवक स्वप्नील रोहीदास शिंदे, अमोल जाधव आणि त्यांच्या इतर साथीदारांनी संगनमत करून कट रचला. संशयित आरोपींनी डॉ. आठरे यांच्या जमीन खरेदी-विक्रीच्या वेगवेगळ्या व्यवहारांमध्ये सुरुवातीला त्यांचा विश्वास संपादन केला.

डॉ. विश्वासराव आरोटे यांचा आदर्श उपक्रम; ५१ शाळांतील विद्यार्थ्यांना भेट!

ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त ५१ शाळांतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व कपड्यांचे वाटप!

अकोले : (स. गांवकरी)

राज्याचे जलसंधारण मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त अनाठायी खर्चाला फाटा देत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने चितळवेढे पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांसाठी सामाजिक बांधिलकीचा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत तब्बल ५१ शाळांतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, कपडे तसेच गोड खाऊचे वाटप करण्यात आले. युवा नेते चंद्रशेखर आरोटे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना साहित्याचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमात बोलताना पालक समितीचे अध्यक्ष संजय आरोटे यांनी विखे परिवाराने गेल्या चार पिढ्यांपासून समाजसेवेची परंपरा जपल्याचे सांगितले. वाढदिवसानिमित्त फुलांचे गुच्छ, सत्कार व इतर अनावश्यक खर्च टाळून विद्यार्थ्यांना शालेय साहित्य देण्याचा उपक्रम हा समाजासाठी आदर्शवत असल्याचे त्यांनी नमूद केले. राज्यभरातील कार्यकर्त्यांनीही अशा प्रकारचे विधायक उपक्रम राबवून शिक्षण क्षेत्राला बळ द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांनी शिक्षणासाठी सातत्याने प्रयत्नशील राहण्याचा संदेश दिला. कोंभाळणे परिसरातील काही विद्यार्थ्यांनी इंग्रजी माध्यमातील शाळांमधून जिल्हा परिषद शाळेत प्रवेश घेतल्याची बाब विशेष कौतुकास्पद असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी आपल्या मनोगतात पत्रकारितेच्या माध्यमातून समाजाचे काहीतरी देणे लागतो ही भावना कायम जपल्याचे सांगितले. गेली २५ ते २६ वर्षे पत्रकारिता करत असताना समाजोपयोगी उपक्रमांमध्ये सहभागी होण्याचा प्रयत्न केल्याचे त्यांनी नमूद केले. शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम असून ज्ञानमंदिरात विद्यार्थ्यांच्या रूपाने उद्याचे सक्षम नागरिक घडत असतात. विद्यार्थ्यांना दिलेली एक वही, एक पेन किंवा एक दप्तरदेखील त्यांच्या उज्ज्वल भवितव्याला दिशा देणारे ठरू शकते, असे त्यांनी सांगितले.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात आलेल्या या उपक्रमाअंतर्गत सुमारे ५१ शाळांतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व कपड्यांचे वितरण करण्यात आले. यासोबतच गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करून त्यांना प्रोत्साहन देण्याचे कार्यही महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ सातत्याने करत असल्याचे डॉ. आरोटे यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमास पालक समितीचे अध्यक्ष संजय आरोटे, युवा नेते चंद्रशेखर आरोटे, मुख्याध्यापक जगन्नाथ झडे, सहशिक्षक पी. टी. पवार, सहशिक्षिका शैला देशमुख, ज्योती भोसले, पालक सुदाम दगडू आरोटे, नारायण मोहटे, गीताराम उघडे, सात्विक आरोटे, मिथुन डावरे, नारायण चव्हाण, नवनाथ चव्हाण यांच्यासह ग्रामस्थ, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

थोडक्यात पण महत्वाचे

दिलीप वळसे पाटील महाविद्यालयात प्रवेश प्रक्रिया सुरु

निमगाव सावा (स. गांवकरी) : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित व श्री पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय व श्री पांडुरंग कनिष्ठ महाविद्यालयात निमगाव सावा (ता. जुन्नर) येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रवेश सुरु झाले आहेत. अकरावी व बारावी कॉमर्स आणि सायन्स, तसेच बी.ए., बी. कॉम., बी.एससी., यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अंतर्गत एम. ए., एम. कॉम. कोर्सेस साठी प्रवेश सुरु झाले आहेत. नॅक मूल्यांकित महाविद्यालय असून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार प्रवेश सुरु झाले आहेत. मुलींसाठी मोफत शासकीय नियमानुसार महाविद्यालयात प्रवेश केले जाणार आहेत. तरी मर्यादित जागा उपलब्ध असल्याने निमगाव सावा परिसर व पंचक्रोशीतील सर्व विद्यार्थ्यांनी त्वरित आपला प्रवेश निश्चित करावा असे महाविद्यालयाकडून आवाहन करण्यात येत आहे.

सेवापूर्ती गौरव सोहळ्याला हितचिंतकांकडून शुभेच्छाचा वर्षाव

नेवासा (स. गांवकरी) : नेवासा तालुक्यातील सुरेगाव रस्त्यावर असलेल्या सदगुरू नारायणगिरी महाराज आश्रमामध्ये नेवासा तालुक्यातील चार ग्रामपंचायतचे ग्रामसेवक व पंचायत समितीचे विस्तार अधिकारी यांच्या आयोजित सेवापूर्ती गौरव सोहळयास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी हितचिंतकांनी सेवानिवृत्त झालेल्या ग्रामसेवकांचा सत्कार करून शुभेच्छाचा वर्षाव केलागावाच्या उत्कर्षासाठी दुवा असलेल्या ग्रामसेवकांच्या कार्याचा गौरव सेवापूर्ती सोहळयात यावेळी करण्यात आला. यावेळी झालेल्या सेवापूर्ती गौरव सोहळयास सदगुरू नारायणगिरी महाराज आश्रमाचे प्रमुख महंत श्री उद्धवजी महाराज मंडलिक नेवासेकर,संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख वेदांताचार्य देविदास महाराज म्हस्के शास्त्री,आमदार विठ्ठलराव लंघे पाटील,माजी आमदार पांडुरंग अभंग,ग्रामसेवक संघटनेचे राज्य अध्यक्ष संजीव निकम,गटविकास अधिकारी संजय लखवाल, अंकुश महाराज जगताप,नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले पाटील, ग्रामपंचायत अधिकारी संघाचे जिल्हाध्यक्ष किशोर जेजुरकर,युवराज ढेरे,सहायक गटविकास अधिकारी बाळासाहेब कासार,माजी अध्यक्ष एकनाथ ढाकणे, विस्तार अधिकारी सुवर्णा लेंढे,नानासाहेब तुवर,अशोक शेळके,भाजपचे तालुकाध्यक्ष प्रतापराव चिंधे प्रमुख अतिथी म्हणून व्यासपीठावर उपस्थित होते.

रविवारी सुरू झालेल्या खुल्या कांदा विक्रीला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



नेवासा (स. गांवकरी) : नेवासा कृषी उत्पन्न बाजार समिती नेवासा येथे दर मंगळवारी व गुरुवारी खुल्या कांद्याची विक्री होते आता शेतकऱ्यांच्या मागणीनुसार सभापती नंदकुमार पाटील यांनी रविवारी देखील खुल्या कांदा विक्री परवानगी दिली त्यामुळे या पहिल्याच रविवारी कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. रविवारी शंभर वाहनांची नोंद झाली. पहिल्याच रविवारी दि.१४ जून रोजी खुल्या कांद्याची मोठ्या प्रमाणावर आवक झाली. बाजार समितीत एकूण शंभरच्या वर शेतकऱ्यांनी शंभर वाहनांद्वारे कांदा विक्रीसाठी आणला होता. तब्बल ४ हजार ९९०क्विंटल उन्हाळी कांद्याची आवक नोंदविण्यात आली. बाजारात कांद्याला दर्जानुसार चांगला भाव मिळाला. एक नंबर कांद्याला सरासरी प्रतिक्विंटल १५०० पर्यंत कमाल भाव मिळाला तर किमान भाव दोनशे प्रति क्विंटल,८०० ते १००० सरासरी भाव मिळाला भाव मिळाल्याची माहिती बाजार समितीचे सभापती नंदकुमार पाटील यांनी दिली आठवड्यात मंगळवारी, गुरुवारी आणि आता रविवारी नेवासा कृषि उत्पन्न बाजार समितीच्या आवारात खुल्या कांद्याची मोठ्या प्रमाणावर आवक झाल्यामुळे बाजार परिसरात दिवसभर व्यापारी व शेतकऱ्यांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे.यावेळी बाजार समितीच्या वतीने शेतकऱ्यांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.

कल्याण रोड येथील गणेश नगर येथे वाढत्या घरफोडी, चोरी

चोरट्यांच्या दहशतीबाबत तात्काळ कठोर कारवाई करणे बाबत पोलिस अधीक्षकांना नागरिकांचे निवेदन

पोलिसांनी गणेशनगर भागात गस्ती वाढवावी नागरीकांची मागणी

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

कल्याण रोड,गणेशनगर परिसरात मागील काही महिन्यांपासून घरफोडी, चोरी तसेच चोरीच्या प्रयत्नांच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीती व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे.

दि.५ जून रोजी याच विषयासंदर्भात गणेश नगर भागातील नागरिकांनी तोफखाना पोलीस स्टेशन मध्ये लेखी निवेदन व संबंधित घटनेचे सिसिटीव्ही फुटेज दिले होते. तथापि,त्या निवेदनावर अद्यापपर्यंत कोणतीही प्रभावी कार्यवाही झालेली दिसून आलेली नाही.उलट त्यानंतर देखील सदर परिसरात चोरट्यांकडून तीन ते चार वेळा रेकी करुन चोरीचे प्रयत्न करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. कल्याण रोड येथील गणेश नगर भागातील नागरिकांच्या वतीने वाढत्या घरफोडी,चोरी व चोरट्यांच्या दहशतीबाबत तात्काळ कठोर कारवाई करणे बाबत जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी गणेशनगर सोसायटीचे चेअरमन गणेश शिंदे,स्वप्निल अंकम, सुरेश मिसाळ, नाना देवतरसे, योगेश दिवाने, अनिल राऊत, पोपट शेळके, विशाल माने, अमोल भांबरकर, अर्जुन नेवसे, रमेश बोल्ली, विठ्ठल आलवाल,महेश शिरसुल, गणेश चिलका, राजू तेल्ला, संजय वाघस्कर, महादेव पिसाळ, प्र मोद तेल्ला, तुषार इरुळे, राधाकिसन अवधूत आदी उपस्थित होते.

सदर चोरटे मध्यरात्रीच्या सुमारास गणेशनगर परिसरात धुमाकूळ घालत असून अनेक रहिवाशांनी त्यांना प्रत्यक्ष पाहिले आहे.त्यांच्या हातात तलवारी,कोयते, कुर्हाडी तसेच इतर घातक शस्त्रे असल्याचे नागरिकांच्या निदर्शनास आले आहे.

हे चोरटे घरांचे दरवाजे, खिडक्यांचे गज व इतर सुरक्षा साधने कापून घरामध्ये जबरदस्तीने प्रवेश करण्याचा प्रयत्न करतात.काही ठिकाणी त्यांनी घरफोडी करण्याच्या उद्देशाने दरवाजे व खिडक्यांची तोडफोड केल्याचेही आढळून आले आहे. विशेष म्हणजे हे चोरटे बहुतांश वेळा विना क्रमांकाच्या (Number Plate) नसलेल्या चारचाकी वाहनांमधून येत असल्याचा दाट संशय आहे. चोरी करण्यापूर्वी परिसरात रेकी करून योग्य संधी साधून घरफोडी केली जात असल्याने नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.भविष्यात कोणतीही गंभीर घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी या प्रकरणाची पोलीस प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन गणेशनगर परिसरात नियमित व वाढीव पोलीस गस्त, संशयित व्यक्तींवर विशेष लक्ष, रात्रीच्या वेळी गस्ती पथकांची नियुक्ती तसेच परिसरातील नागरिकांच्या जीवित व मालमत्तेच्या सुरक्षेच्या दृष्टीने या प्रकरणात तातडीने प्रभावी उपाययोजना करण्यात याव्यात.अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

सक्तीच्या मीटर बदलाला विरोध

खोडद : (स. गांवकरी)

महावितरणकडून सध्या स्मार्ट मीटर बसवण्याबाबत वीज ग्राहकांना एसएमएस आणि इतर माध्यमांतून सूचना दिल्या जात आहेत. मात्र, ग्रामीण भागातील ग्राहकांमध्ये यामुळे मोठा संभ्रम आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर, सुस्थितीत असलेले आणि अचूक रीडिंग देणारे विद्यमान मीटर बदलून स्मार्ट मीटर बसवण्याची सक्ती करू नये, अशी मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे मध्य महाराष्ट्र प्रांताचे अध्यक्ष बाळासाहेब औटी यांनी केली आहे. बाळासाहेब औटी यांच्या मते, वीज ग्राहकांच्या हिताचे रक्षण करणे ही ग्राहक पंचायतीची महत्त्वाची भूमिका आहे. तंत्रज्ञानाला विरोध नाही, मात्र ग्राहकांच्या संमतीशिवाय आणि पुरेशी माहिती न देता कोणतीही सक्ती खपवून घेतली जाणार नाही. ग्राहकांच्या हक्कासाठी लोकशाही व कायदेशीर मार्गाने संघर्ष करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. स्मार्ट मीटर तंत्रज्ञानाबाबत ग्राहकांना योग्य माहिती, सुरक्षा व्यवस्था, तपासणी सुविधा आणि भविष्यातील आर्थिक परिणामांबाबत स्पष्टता देणे आवश्यक आहे. स्मार्ट मीटर नादुरुस्त झाल्यास त्याची निष्पक्ष तपासणी करण्यासाठी मान्यताप्राप्त प्रयोगशाळा आणि पारदर्शक व्यवस्था असावी.

वीज कायदा 2003, ग्राहक संरक्षण कायदा 2019 आणि संविधानिक अधिकारांचा विचार करूनच कोणतीही प्रक्रिया राबविणे गरजेचे आहे असे सांगितले.

सोलाट वस्ती शाळेत नवागतांचे उत्साहात स्वागत

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

पाथर्डी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सोलाट वस्ती (मिरी) येथे इयत्ता पहिलीमध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात स्वागत करण्यात आले.

यावेळी नवागत बालकांना सनरूफ असलेल्या चारचाकी वाहनात बसवून विद्यार्थ्यांची आकर्षक मिरवणूक काढून शाळेत प्रवेश केला.गाडीत उभे राहून मुलांनी जल्लोष केला. रंगीबेरंगी फुगे, टोप्या आणि पुष्पगुच्छांनी नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. प्रत्येक विद्यार्थ्याला गुलाबाचे फूल देऊन त्यांचा शाळेतील पहिला दिवस संस्मरणीय करण्यात आला.

विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील हा महत्त्वाचा क्षण जपण्यासाठी "पहिले पाऊल" या अभिनव उपक्रमांतर्गत पहिलीच्या विद्यार्थ्यांच्या पावलांचे ठसे कोऱ्या कागदावर घेण्यात आले. हे ठसे पालकांना जपून ठेवण्यासाठी देण्यात आले. आपल्या मुलांच्या शैक्षणिक प्रवासाची अशी आगळी-वेगळी सुरुवात पाहून पालकही भावूक झाले आणि आनंद व्यक्त केला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके तसेच समग्र शिक्षा अभियानांतर्गत मोफत गणवेशांचे वितरण करण्यात आले. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांसाठी मिष्टान्न भोजनाचे आयोजनही करण्यात आले.

यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच शाळेसाठी पाच गुंठे जागा बक्षीसपत्राद्वारे उपलब्ध करून देणारे श्री. बद्रीशेठ सोलाट यांचा शाळेच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. "मिशन आपुलकी" अंतर्गत लोकसहभागातून शाळेचा कायापालट करण्याचा संकल्प पालकांनी यावेळी व्यक्त केला.

या कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन व आयोजन शाळेतील शिक्षक संतोष दुसंगे आणि सुनील पवळे यांनी केले होते. कार्यक्रमास लक्ष्मण वेताळ, गोरख झाडे, सुदाम पाटोळे, सारिका सोलाट, ज्योती सोलाट, धनेश्वरी झाडे, सुनिता सोलाट, सारंगधर खोसे, प्रशांत सोलाट, पुष्पलता सोलाट यांच्यासह अनेक पालक उपस्थित होते.

शाळेच्या या उपक्रमाचे मिरी केंद्राचे केंद्रप्रमुख दगडू महांडुळे, विस्ताराधिकारी निलेश क्षीरसागर आणि गटशिक्षणाधिकारी शिवाजी कराड यांनी विशेष कौतुक केले.

महाराष्ट्र बालक मंदिर शाळेत विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

अहमदनगर : (स. गांवकरी)

रंगीबेरंगी फुगे, आकर्षक रांगोळ्या, आनंददायी वाद्यसंगीत आणि शिक्षकांकडून औक्षण करून गुलाबपुष्प देत करण्यात आलेले स्वागत अशा उत्साहपूर्ण वातावरणात लालटाकी रोड येथील महाराष्ट्र बालक मंदिर शाळेत नवागत विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

नवीन गणवेश, नवीन दप्तर, रंगीत डबा व वॉटरबॅगसह शाळेत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उत्साह आणि आनंद ओसंडून वाहत होता.

सर्व शिक्षा अभियानांतर्गत आयोजित या स्वागत समारंभात नवागत तसेच इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे सदस्य अर्जुनराव पोकळे, मनपाचे विषयतज्ञ शिंदे, माजी मुख्याध्यापक सुरेश शेवाळे, माजी मुख्याध्यापिका अर्चना गिरी, मुख्याध्यापिका सुनिता शेवाळे आणि पत्रकार नवनाथ खराडे यांच्या हस्ते हवेत फुगे सोडून, गुलाबपुष्प व पुस्तके देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना अर्जुनराव पोकळे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी शासनाकडून उपलब्ध होणाऱ्या मोफत पाठ्यपुस्तकांचा जास्तीत जास्त लाभ घेऊन गुणवत्तापूर्ण शिक्षण घ्यावे. उद्याचे सुजाण नागरिक बनण्यासाठी अभ्यासासोबतच जिज्ञासू वृत्ती जोपासणे आवश्यक आहे. दूरदर्शन व मोबाईलचा अतिरेकी वापर टाळून नवीन ज्ञान आत्मसात करण्यावर भर द्यावा. प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनात प्रश्न निर्माण होणे आणि त्यांची उत्तरे शोधण्याची वृत्ती विकसित होणे गरजेचे असून प्राथमिक व माध्यमिक शिक्षणच भविष्यातील यशाचा भक्कम पाया घालते, असे त्यांनी सांगितले. प्रास्ताविकात मुख्याध्यापिका सुनिता शेवाळे यांनी सांगितले की, अशा स्वागत समारंभांमुळे विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या मनातील शाळेविषयीचे दडपण कमी होण्यास मदत होते. शासनाच्या या उपक्रमामुळे शाळांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण होत असून विद्यार्थ्यांना शाळेची गोडी लागण्यास हातभार लागतो. मुलांनी आनंदी वातावरणात हसत-खेळत शिक्षण घ्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

माजी मुख्याध्यापिका अर्चना गिरी म्हणाल्या की, नवीन पुस्तके, नवीन दप्तर आणि नवीन शैक्षणिक वर्ष यामुळे मुलांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. विद्यार्थ्यांनी मन लावून अभ्यास करावा, शाळेची शिस्त पाळावी, शिक्षकांचा आदर करावा आणि आपल्या आई-वडिलांसह शाळेचे नाव उज्ज्वल करावे. माजी मुख्याध्यापक सुरेश शेवाळे यांनी शासनाच्या या अभिनव उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, अशा स्वागत कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दल आकर्षण निर्माण होते. शाळेची उज्ज्वल परंपरा कायम राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी मेहनत, शिस्त आणि संस्कार यांचा अंगीकार करावा. मोबाईलपासून दूर राहून गाणी, गोष्टी, खेळ आणि अभ्यास यांचा समतोल साधत सर्वांगीण विकास साधावा, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयश्री म्याना यांनी केले, तर आशा कराळे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

हेमंतभाऊ कोल्हे यांचा साधेपणाने वाढदिवस साजरा

खोडद : (स. गांवकरी)

उत्तर पुणे जिल्ह्यातील अग्रगण्य समजली जाणारी, आर्थिक दृष्ट्या संपन्न, आणि सभासदांच्या विश्वासास पात्र असणारी धर्मवीर संभाजी नागरी सहकारी पतसंस्था नारायणगाव तालुका जुन्नर या संस्थेचे विद्यमान संचालक आणि ग्रामपंचायत नारायणगावचे विद्यमान सदस्य यांचा धर्मवीर संभाजी नागरी सहकारी पतसंस्था संस्थेच्या कार्यालयात पुष्पगुच्छ देवून वाढदिवस साजरा करण्यात आला. धर्मवीर नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष प्रवीणदादा डेरे यावेळी म्हणाले, "पतसंस्था ही सहकारी तत्त्वावर चालणारी आर्थिक संस्था असते. लोकांच्या बचतीला प्रोत्साहन देणे आणि गरजू सभासदांना कर्ज उपलब्ध करणे. हे संस्थेचे मुख्य उद्दिष्ट जरी असले". तरी ' धर्मवीर नागरी सहकारी पतसंस्था ही संस्था नफा कमवण्यापेक्षा सभासदांच्या कल्याणाला प्राधान्य देते' या सर्व कारभाराला उत्तमपणे साथ देणारे संस्थेचे विश्वासू संचालक असावे लागतात. त्यापैकी या संस्थेचे सर्वच संचालक विश्वासू आहेत.त्यापैकी एक हेमंतभाऊ कोल्हे आहेत. म्हणूनच उत्तर पुणे जिल्ह्यामध्ये धर्मवीर नागरी सहकारी पतसंस्था ही शिखर पार करत आहे. यासाठी संचालक हेमंत कोल्हे यांचे योगदान आहे. यावेळी पतसंस्थेचे व्यवस्थापक ज्ञानेश्वर औटी म्हणाले, 'पतसंस्थेचे सभासद हेच त्याचे मालक असतात. आणि तेच ग्राहक असतात. पतसंस्थेचा कारभार सभासदांनमधून निवडलेल्या संचालक मंडळातून चालतो. या पतसंस्थेच्या संचालक पदावर हेमंत कोल्हे आहेत .ते पतसंस्थेच्या हितासाठी आणि ग्राहकांच्या कल्याणासाठी सतत मार्गदर्शन करत असतात.

जाहीर नोटीस

अकोले येथील सह दिवाणी न्यायालय, क. स्तर, अकोले जि. अ.नगर यांचे न्यायालयात..

ॲड. एस. डी. पोखरकर .....दिवाणी चौ अर्ज. ०५/२०२६ .... निशाणी क्र. ७.

१.गणपत मुरलीधर जाधव, वय ४५ वर्ष,राहणार पिसेवाडी, ता.अकोले,जि. अहमदनगर..... **अर्जदार**

विरुद्ध.....१. बाळू मुरलीधर जाधव , २.रतनबाई भाऊसाहेब कुरकुटे १ व २ राहणार पिसेवाडी, ता.अकोले ३. पुजा दिलीप पाटील, राहणार नारायणगाव, ता. जुन्नर जिल्हा पुणे ..... **सामनेवाले**

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात दिवाणी चौकशी अर्ज क्र. ०५/२०२६ दाखल केला आहे. अर्जदार हा मौजे पिसेवाडी विलासनगर येथील रहिवासी आहे. अर्जदार व सा.वाला हे मयत मुरलीधररघुनाथ जाधव व मयत शांताबाई मुरलीधर जाधव यांचे मुले आहेत. अर्जदार व सा.वाले यांचे वडिल हे दि.२६.०४. २०२१ रोजी मौजे पिसेवाडी येथे मयत झाले असून त्यांची आई शांताबाई मुरलीधर जाधव हि दि.१०.०७. २०१६ रोजी मुरलीधर रघुनाथ जाधव यांच्या मृत्यूपूर्वी मयत झाली आहे. अर्जदार व सा.वाला यांचे वडिल मुरलीधर रघुनाथ जाधव हे बस्तीराम सारडा विडी उद्योग, सिन्नर या कारखान्यामध्ये विडी कामगार होते. त्यांची भविष्य निधी निर्वाह संगठन यांचेकडे खाते नं.पी.पी.ओ.क्र.१९१३० मध्ये जमा करून ठेवलेली होती. त्यांचे मृत्यूसमयी वरील खात्यामध्ये एकूण रक्कम रुपये ६७६००/- जमा झालेली होती. सदर भविष्य निधी निर्वाह संघटनासाठी नॉमिनी म्हणून मुरलीधर रघुनाथ जाधव यांनी त्यांची पत्नी शांताबाई मुरलीधर जाधव यांची कागदोपत्री नेमणूक केलेली होती. परंतु पत्नी शांताबाई ही पती मुरलीधर मयत होण्यापूर्वीच मयत झालेली आहे. सदरची रक्कम अर्जदार व सा.वाला यांनी भविष्य निधी निर्वाह संगठन नाशिक यांचेकडे मागणी केली असता संबंधीत अधिकाऱ्यांनी दि. ३१/१०/२०२१ रोजी सा.वाला नं. १ यांचकडे मागणी केली परंतु सा.वाला नं. १ यांचेकडून सदरचे पत्र गहाळ झाले त्यानंतर ते पत्र अलिकडेच तपासणी करत असताना सापडले म्हणून वारस प्रमाणपत्र सा.वाला नं. १ यांना काढणे शक्य नसल्यामुळे त्याने अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र काढण्यासाठी पत्र देऊन विनंती केली. अर्जदार यांना सदरचा अर्ज मे. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता दाखल करणे भाग पडले.

तरी सदर अर्जदार व सा.वाले हेच मयत मुरलीधर रघुनाथ जाधव यांचे कायदेशिर वारसदार आहेत. व तसे कायदेशिर वारस असलेबाबतचे वारस प्रमाणपत्र मिळणेकरिता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी अर्जदार व सा.वाला हे वर मयताचे कायदेशिर वारस नाहीत, त्यांचेशिवाय दुसरे कोणी वारसदार आहे, असे कोणाचे म्हणणे असल्यास अगर त्यात कोणाचा हितसंबंध असल्यास त्यांनी या न्यायालयात नेमलेली तारीख **२९.०६.२०२६** रोजी सकाळी १०:३० वाजता अथवा सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत आपण स्वतः अगर कायदेशिर वकिलामार्फत या अर्जात हजर होवून लेखी हरकती कळवाव्यात. अन्यथा कोणाचेही काही एक म्हणणे नाही असे समजून मे. कोर्ट अर्जदाराचा पुरावा ऐकुन घेवुन कायदद्याप्रमाणे पुढील योग्य तो आदेश पारीत करतील. याची कृपया नोंद घ्यावी.

आज दि. १०/०६/२०२६ रोजी सही व शिक्क्यानिशी दिले असे.

कामगिरी क्लर्क — हुकूमावरून,

एस.जी.जगदाळे. — सहा. अधिक्षक

क. लिपीक — दिवाणी न्यायालय क. स्तर, अकोले

अनाम प्रेम परिवाराचा लेकी-जावयांसाठी स्नेहपूर्ण वाणदान सोहळा

औक्षण, उखाणे आणि प्रेमाच्या वर्षावात रंगला नातेसंबंधांचा अविस्मरणीय उत्सव

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

अधिक मासाच्या पावन पर्वाचे औचित्य साधत अनाम प्रेम परिवाराच्या वतीने आयोजित करण्यात आलेला लेकी-जावयांचा वाणदान सोहळा प्रेम, आपुलकी, संस्कार आणि कौटुंबिक नात्यांचा हृद्य सोहळा ठरला. माणुसकीच्या नात्यांना जपणाऱ्या या आगळ्यावेगळ्या उपक्रमाने उपस्थितांच्या मनात आनंद, समाधान आणि कृतज्ञतेची भावना जागवली.

फुलांच्या मनमोहक सजावटीने, रंगीबेरंगी रांगोळ्यांनी आणि मंगलमय वातावरणाने सजलेल्या सभागृहात प्रत्येक लेकी-जावयाचे पारंपरिक पद्धतीने औक्षण करून स्वागत करण्यात आले. त्यांच्या ताटाभोवती काढलेल्या आकर्षक पुष्परांगोळ्यांनी कार्यक्रमाला सौंदर्याची अनोखी किनार लाभली. स्नेह, आदर आणि आत्मीयतेने ओथंबलेल्या या वातावरणात उपस्थित प्रत्येकजण भारावून गेला.

या प्रसंगी प्रत्येक लेकी-जावयास साडी, कपडे आणि वाण प्रेमपूर्वक भेट देण्यात आले. विशेष आकर्षण ठरले ते जोडप्यांनी घेतलेले उखाणे. पारंपरिक शैलीत घेतलेल्या उखाण्यांमधून नात्यांचा गोडवा, परस्परांवरील प्रेम आणि कौटुंबिक संस्कारांचे दर्शन घडले. उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात या सुंदर क्षणांचा आनंद लुटला.

लाभार्थी जोडप्यांनी अनाम प्रेम परिवाराचे मनःपूर्वक आभार मानत, "हा सन्मान आणि प्रेम आम्हाला आयुष्यभर स्मरणात राहील," अशा भावना व्यक्त केल्या.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अनाम प्रेमचे अध्यक्ष अजित माने, उपाध्यक्ष डॉ. प्रकाश शेठ, खजिनदार राधा मिलिंद कुलकर्णी, विश्वस्त अविनाश बोपर्डीकर तसेच अनिता अजित माने, डॉ. मेघना मराठे, अभय रायकवाड,हस्मिता गांधी, संतोष चोपडा, उज्वल देसाई, जाधव, अंबरीश कोतवाल, अनिता अजित माने, रेवती अद्वैत क्षीरसागर, माधुरी चितळे, श्रीकांत कुलकर्णी, विकास कंद, मिलिंद मापरा, अरविंद पटवर्धन, सौ. स्नेहल नारायण जाधव, गीता महाजन, ज्योती पुरी यांच्यासह अनेक सेवाभावी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेत मोलाचे सहकार्य केले.

यावेळी मनोगत व्यक्त करताना अध्यक्ष अजित माने म्हणाले, "अधिक मास हा केवळ धार्मिक विधींचा काळ नसून नात्यांमधील प्रेम, जिव्हाळा आणि संस्कार दृढ करण्याची सुवर्णसंधी आहे. समाजातील प्रत्येक लेक आणि जावई हे आपल्या कुटुंबाचेच घटक आहेत. त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणे, त्यांना सन्मानाने आपलेसे करणे आणि प्रेमाचा संदेश देणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. अनाम प्रेम परिवार सामाजिक बांधिलकी जपत अशाच उपक्रमांद्वारे माणुसकीची वीण अधिक मजबूत करत राहील." अधिक मासाच्या पावन पर्वात आयोजित करण्यात आलेला हा वाणदान सोहळा केवळ वस्तूंचे दान नव्हते, तर प्रेम, सन्मान, माया, जिव्हाळा आणि संस्कारांचे दान होते. औक्षणाचा सन्मान, उखाण्यांची मधुरता आणि आपुलकीने भरलेले वातावरण यामुळे हा कार्यक्रम उपस्थितांच्या स्मरणात दीर्घकाळ राहणार आहे. अनाम प्रेम परिवाराने पुन्हा एकदा समाजकार्य आणि माणुसकीची सुंदर परंपरा जपत सामाजिक ऐक्याचा प्रेरणादायी संदेश दिला.

पारनेर तालुक्यात दुष्काळसदृश स्थिती; चारा छावण्यांची मागणी

पारनेर : (स. गांवकरी)

पारतालुक्यात यंदा अपुऱ्या पावसामुळे आणि वाढत्या उष्णतेमुळे तीव्र दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर पारनेर तालुक्यात तातडीने शासनमान्य चारा छावण्या सुरू करण्याची मागणी निलेश लंके प्रतिष्ठानचे पदाधिकारी व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते अमोल उगले यांनी नायब तहसीलदार कारखीले साहेब यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

तालुक्यात हिरवा व वाळलेला चारा पूर्णपणे उपलब्ध नसल्याने पशुपालक मोठ्या संकटात सापडले आहेत. दुग्ध व्यवसाय हा येथील अनेक कुटुंबांचा प्रमुख आर्थिक आधार आहे. चाऱ्याच्या वाढत्या खर्चामुळे शेतकऱ्यांना मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. जनावरांचे हाल थांबवण्यासाठी छावण्यांमध्ये पुरेसा चारा आणि पाण्याची व्यवस्था करण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदनात म्हटले आहे की, टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटातील सद्यस्थितीचा आढावा घेऊन प्रशासनाने तात्काळ शासनाकडे प्रस्ताव पाठवावा. यामुळे पशुधनाचे रक्षण होऊन शेतकऱ्यांचा दुग्ध व्यवसाय टिकून राहील. या निवेदन प्रसंगी भोंद्रे गावचे सरपंच अभिजीत झावरे, वारणवाडीचे सरपंच संजय काशीद, सामाजिक कार्यकर्ते अशोक खैरे, निलेश पवार, युवराज पाटील खिलारी, सुरेश झावरे, ग्रामपंचायत सदस्य डॉ. आकाश झावरे, सरपंच अनिल तांबडे, पियुष कोकाटे, सचिन वाफारे, मयूर आंधळे, विवेक शिंदे, देसवडे येथील संपत फटांगरे आदी उपस्थित होते. दुष्काळी परिस्थितीमुळे तालुक्यातील शेतकरी आणि पशुपालक चिंतेत आहेत. प्रशासनाने शेतकऱ्यांच्या मागणीचा गांभीर्याने विचार करून लवकरात लवकर चारा छावण्या सुरू कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

आळंदी : केंद्र सरकारच्या राष्ट्रीय आरोग्य प्रणाली संसाधन केंद्रा मार्फत (NQAS) घेण्यात आलेल्या सर्वेक्षणात पुणे जिल्हा परिषदेची आरोग्य उपकेंद्रे गुणवत्ता व दर्जात महाराष्ट्रात प्रथम क्रमांकावर आली आहेत. यात खेड तालुक्यातील उपकेंद्रांचा समावेश झाल्याने खेड तालुक्याचे ही नावलौकिकात वाढ झाली आहे. पुणे जिल्हा परिषदेच्या टाकळकरवाडी (तालुका खेड) प्राथमिक आरोग्य उपकेंद्रास ९४.८ टक्के तर रिहे प्राथमिक आरोग्य उपकेंद्रास ९३.२९ टक्के गुण प्राप्त झाले आहेत. या गुणवत्तेच्या आधारे ही दोन्ही उपकेंद्रे महाराष्ट्रात सर्वोत्तम ठरली आहेत.

थोडक्यात बातम्या...

पुस्तके, गुलाबपुष्प वाटप करत नवोगत विद्यार्थ्यांचे स्वागत

पारनेर (स. गांवकरी) : शिक्षण व्यवस्था ही सामाजिक व्यवस्था आहे. ती कोणाच्याही मालकीची नाही. समाजाचा जितका सहभाग वाढेल तितकी समाजाला ही शिक्षण व्यवस्था आपली वाटू लागेल. शाळेत विद्यार्थ्यांच्या वर्तनात परिवर्तन होत असते म्हणून शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे असे प्रतिपादन जिल्हा मराठा संस्थेचे विश्वस्त सन्मा. सिताराम खिलारी पाटील यांनी केले. पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या श्री ढोकेश्वर विद्यालयात नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत समारंभ कार्यक्रम प्रसंगी सिताराम खिलारी उर्फ आण्णा बोलत होते. या प्रसंगी इयत्ता 5 वी ला तसेच इतर वर्गात नव्याने आलेल्या विदयार्थ्यांचे गुलाबपुष्प, मोफत पुस्तके आणि बिस्कीट वाटप करून उत्साहात स्वागत करण्यात आले. तसेच विद्यालयाच्या आवारात पद्माभूषण आण्णासाहेब हजारे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

आंतरराज्य चोरट्यांचा पाठलाग करून मुद्देमालासह केजी अटक

सोलापूर (स. गांवकरी) : आंतरराज्यीय कार चोरट्यांचा ५०० किमी पाठलाग करून तेलंगणातून एकास अटक करण्यात आली आहे तर ; २४.८५ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सोलापूर शहरातील अवंती नगर, मुरारजी पेठ येथून चोरीला गेलेल्या कारचा छडा लावण्यात फौजदार चावडी पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण (DB) पथकाला मोठे यश आले आहे. तब्बल १५ दिवस दिवस-रात्र सलग तपास करत, महाराष्ट्र ते तेलंगणा असा ५०० किलोमीटरचा प्रवास आणि शेकडो सीसीटीव्ही कॅमेरे धुंडाळून पोलिसांनी आंतरराज्यीय कार चोरी करणाऱ्या टोळीतील एका सराईत गुन्हेगाराला तेलंगणातील निझामाबाद येथून बेड्या ठोकल्या आहेत. या कारवाईमुळे कार चोरीचे तब्बल ५ गुन्हे उघडकीस आले असून गुन्ह्यात वापरलेल्या कारसह २४ लाख ८५ हजार रुपये किमतीची ४ वाहने जप्त करण्यात आली आहेत.

२४ वर्षीय रिक्षाचालकाची निर्घृण हत्या करून घराच्या दरवाजाला टांगला पाय

सोलापूर (स. गांवकरी) : पंढरपुरात खळबळ उडवून देणारी खूनाची मोठी घटना घडली आहे. किरकोळ वादातून २४ वर्षीय रिक्षाचालकाची निर्घृण हत्या करण्यात आली आहे हत्या करून घराच्या दरवाजाला त्याचा पाय टांगण्यात आला आहे. राज्याची आध्यात्मिक राजधानी आणि नेहमी भक्तीच्या रंगात न्हाऊन निघालेल्या पंढरपूर शहराला एका अतिशय भयानक आणि अंगावर काटा आणणाऱ्या गुन्हेगारी घटनेने हादरवून सोडले आहे. नेहमी शांतता आणि भजनाचे सूर ऐकू येणाऱ्या या पावन भूमीत माणुसकीला काळिमा फासणारी एक निर्घृण हत्या उघडकीस आली आहे. केवळ एका साध्या आणि किरकोळ वादातून एका तरुणाचा जीव इतक्या भयानक पद्धतीने घेतला जाऊ शकतो यावर स्थानिक नागरिकांचा विश्वास बसत नाहीये. या क्रूर घटनेत एका २४ वर्षीय रिक्षाचालकाची अतिशय निर्दयीपणे हत्या करण्यात आली असून मारेकऱ्यांनी केलेल्या अमानुष प्रकारामुळे संपूर्ण परिसरात दहशत पसरली आहे. गंभीर वैर नसताना केवळ एका किरकोळ वादातून एवढे टोकाचे पाऊल उचलले जाणे ही समाजासाठी अत्यंत चिंतेची बाब बनली आहे. हल्ली लोकांच्या मनातील सहनशीलता इतकी कमी झाली आहे की छोट्याशा कारणावरून थेट दुसऱ्याचा जीव घेण्यापर्यंत मजल जात आहे. या २४ वर्षीय रिक्षाचालकाची हत्या करताना मारेकऱ्यांनी मानवतेच्या सर्व मर्यादा ओलांडल्या. संतापाच्या या भरात त्यांनी या तरुणाला अत्यंत क्रूरपणे संपवले. एका तरुण आणि कष्टाळू रिक्षाचालकाचा असा दुर्दैवी शेवट झाल्याने नागरिकांमधून हळहळ व्यक्त केली जात आहे.

शासकीय सेवांचा विशेष कॅम्प संपन्न

शिर्डी (स. गांवकरी) : जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री माननीय नामदार राधाकृष्ण विखे पाटील साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त प्रभाग क्रमांक ७ मधील नागरिकांसाठी विविध शासकीय सेवांचा विशेष कॅम्प आयोजित करण्यात आला होता. या कॅम्पचे उद्घाटन माननीय श्रीमती धनश्रीताई विखे यांच्या हस्ते करण्यात आले. नगरसेविका सौ. सरिता गणेश सोनवणे, सामाजिक कार्यकर्ते गणेशभाऊ सोनवणे तसेच योगेशभाऊ गोंदकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या कॅम्पमध्ये नागरिकांना विविध शासकीय योजनांशी संबंधित सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. या कॅम्पमध्ये नवीन आधार कार्ड नोंदणी, आधार कार्ड अपडेट, पॅन कार्ड संबंधित सेवा, ई-श्रम कार्ड, बांधकाम मजूर नोंदणी, आयुष्मान भारत कार्ड तसेच विविध शासकीय योजनांसाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पूर्तता व नवीन कार्ड काढण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.

अहिल्यानगर जिल्ह्यात पाणीकपात लागू होणार !

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांचा आदेश

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

धरण व कालव्यांच्या क्षेत्रातील अनधिकृत पाणीउपसा थांबवण्यासाठी वीजपुरवठा खंडित करावा असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले आहेत. महापालिका, नगरपालिका व स्थानिक स्वराज्य संस्थांनी दिवसाआड पाणीपुरवठ्याचा निर्णय घ्यावा, असेही आदेश त्यांनी दिले.

एल निनोचा संभाव्य प्रभाव, पाणीसाठा आरक्षण व कृषी विभागाच्या उपाययोजनांच्या तातडीच्या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी विविध निर्देश दिले. निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते, जलसंपदा विभागाचे अध्यक्ष अभियंता बाळासाहेब शेटे, कार्यकारी अभियंता सायली पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, जिल्हा जलसंधारण अधिकारी पांडुरंग गायसमुद्रे, नगरपालिका प्रशासनाधिकारी डॉ. प्रदीप पठारे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. वीरेंद्र बढदे, नायब तहसीलदार भारती घोरपडे तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

पिण्याच्या पाण्याची संभाव्य टंचाई लक्षात घेऊन शेतीसाठीचे पाणी आवर्तन तात्काळ बंद करावे, जलसंपदा विभागाने पाणीचोरी रोखण्यासाठी भरारी पथके नियुक्त करावीत, कालवे व बॅकवॉटर क्षेत्रातील अनधिकृत उपसा त्वरित बंद करावा, त्यासाठी विद्युत वितरण केंद्रे बंद करून वीज पुरवठा खंडित करावा, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

महापालिका, नगरपालिका व स्थानिक स्वराज्य संस्थांनी उपलब्ध पाणीसाठ्यानुसार पाणीपुरवठ्याची नियोजन करावे, स्थानिक परिस्थितीनुसार नागरिकांना दैनंदिन किंवा दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घ्यावा, जलसंपदा विभागाने पाणीसाठ्याची स्थिती तपासून पाण्याचा योग्य वापरासाठी सविस्तर नियोजन आराखडा तातडीने सादर करावा, असेही त्यांनी सांगितले. कृषी विभागाने शेतकऱ्यांना पेरणीबाबत योग्य मार्गदर्शन करावे, जमिनीत पुरेशी ओल व समाधानकारक पाऊस पडल्याशिवाय पेरणीची घाई करू नये याची जनजागृती करावी, उतारावर आडवी पेरणी करण्याची जनजागृती करावी, खतांचा काळाबाजार, लिंकिंग होणार नाही यासाठी तपासणी करावी, डिजिटल पीक पाहणी मोहीम तातडीने पूर्ण करावी, अशाही सूचना देण्यात आल्या.कालव्यांद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करताना मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात असल्यास अशा ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे अधिक फायदेशीर की पाणी बचतीचे ठरत असेल तर त्याची पर्यायी तांत्रिक व प्रशासकीय पातळीवर तपासणी करण्याचे निर्देशही जिल्हाधिकारी आशिया यांनी बैठकीत दिले.

माऊली मंदिरात पूजा अभिषेक उत्साहात; सिद्धबेटात वृक्षारोपण

आळंदी : (स. गांवकरी)

ज्येष्ठ समाज अण्णा साहेब हजारे यांचे वाढदिवसा निमित्त श्री संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलीचे संजीवन समाधी मंदिरात श्रींचे वैभवी चल पादुकांवर अभिषेक पूजा करण्यात आली. विविध उपक्रमांनी पद्मश्री अण्णासाहेब हजारे यांचा वाढदिवस आळंदीत साजरा करण्यात आला. यात सिद्धबेट येथे वृक्षारोपण, स्वकुळ साळी समाज ज्ञातीगृह सभागृहात विविध क्षेत्रातील मान्यवर यांचे विशेष उल्लेखनीय कार्याचा सन्मानपत्र, श्रीफळ, शाल, उपरणे देऊन सत्कार करीत सन्मान करण्यात आला. या प्रसंगी संयोजक अर्जुन मेदनकर, बाळासाहेब चौधरी, सुरेशभाऊ टाकळकर, प्रकाश पाचारणे , रोहिदास कदम, सचिन तापकीर, अमित गडदे, गौतम पाटोळे, शिवाजी कारेकर गुरुजी, बाजीराव नाना लोखंडे, बाबासाहेब भंडारे, हमीद शेख, श्रींचे पुजारी राजाभाऊ चौधरी यांनी वेदमंत्र जय घोष करीत श्रींची पूजा केली. या वेळी ज्येष्ठ समाजसेवक अण्णासाहेब हजारे यांना दीर्घायुरोग्य लाभावे या साठी पूजा, प्रार्थना करीत साकडे घालण्यात आले.

सिद्धबेटात वृक्षारोपण आणि स्वकुळ साळी समाज ज्ञातीगृह येथील कार्यक्रमात १८ मान्यवर पदाधिकारी यांना विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल सन्मानपत्र, शाल, उपरणे, श्रीफळ देऊन उपस्थित मान्यवरांचे हस्ते सन्मानित करण्यात आले.

सुहास कदम यांनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

सोलापूर : (स. गांवकरी)

सोलापूर मधील अवैध धंदे बंद करण्याच्या मागणीसाठी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक आघाडीचे अध्यक्ष सुहास कदम यांनी मुख्यमंत्र्यांची यांची भेट घेऊन सोलापूर मधील सर्व अवैध धंदे बंद करण्यात यावे अशी मागणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. सुहास कदम पुढे बोलताना म्हणाले की, आमदार आणि वरीष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहे आणि सोलापूर शहरातील अवैध धंदेची वसुली पासून ते अवैध धंदे उभं करण्यात कुणाची भांडवल गिरी या सर्व गोष्टी मुख्यमंत्री महोदय यांच्या समोर मांडणार आहोत असेही त्यांनी स्पष्ट केले. सोलापूर शहर पोलीस आयुक्त आणि उपायुक्त हे चांगले अधिकारी आहेत.परंतु या चांगल्या अधिकाऱ्याच्या खांद्यावर बंदूक ठेवून,त्यांच्या नावाचा वापर करून विशिष्ठ दर महिन्याला अवैध धंद्याच्या माध्यमातून कोटी रुपये गोळा करतात "कॅप्टन आणि दोन व्हाईस कॅप्टन यांचीही तक्रार करण्यात येणार आहे. अवैध धंद्याच्या माध्यमातून सोन्याचे अंडी देणाऱ्या कॅप्टन आणि दोन व्हाईस कॅप्टन ला कश्या पध्दतीने वाचवता येईल आशा पद्धतीची परिकष्टा करावे लागत आहे.आणि आमदार, नगरसेवक,करीत आहेत, त्यांची सर्व पोलखोल मुख्यमंत्री आणि पोलीस महासंचालक यांच्या कडे करणार आहे. असेही कदम यांनी सांगितले. भरदिवसा सोलापूर शहरात सोन्याच्या दुकानावर दरोडा,रोज एक एक नवीन पराक्रम सोलापूर शहरात घडत आहेत मात्र,सोलापूर शहराचे पोलीस प्रशासन मात्र फक्त अवैध वसुली मध्ये मग्न आहे

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे शाळा प्रवेशोत्सव उत्साहात

टाकळी ढोकेश्वर : (स. गांवकरी)

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा टाकळी ढोकेश्वर येथे नवीन शैक्षणिक वर्षाच्या स्वागतासाठी शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात आणि हर्षोल्हासात साजरा करण्यात आला. इयत्ता पहिलीत प्रवेश घेणाऱ्या छोट्या विद्यार्थ्यांचे ढोल-ताशा, रंगीबेरंगी फुगे आणि आकर्षक सजावटीच्या गजरात जंगी स्वागत करण्यात आले. शाळेच्या प्रवेशद्वारातच नवागत विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प, आकर्षक भेटवस्तू आणि मिठाई देऊन त्यांना शाळेच्या कुटुंबात सामील करण्यात आले. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. गणेश झावरे, उपाध्यक्ष श्री. योगीराज झावरे, उपाध्यक्षा सौ. शितल रांधवान यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शालेय व्यवस्थापन समिती सदस्य, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पहिलीच्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, पाठ्यपुस्तके आणि शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील निरागस आनंद, पालकांचा उत्साह आणि शिक्षकांचे स्वागत यामुळे संपूर्ण कार्यक्रमात आनंदी आणि उत्साही वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमात शिक्षणाच्या महत्त्वावर भर देत, "प्रत्येक बालकाने शाळेत दाखल व्हावे आणि शिक्षण घेऊन उज्ज्वल भवितव्य घडवावे," असे आवाहन मान्यवरांनी केले. ग्रामीण भागातील बालकांच्या शिक्षणासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. शाळेतील शिक्षक-शिक्षिकांनी विद्यार्थ्यांना प्रेमाने आणि आपुलकीने स्वीकारल्याने पालकांना समाधान वाटले. या यशस्वी कार्यक्रमासाठी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. गणेश झावरे, उपाध्यक्ष श्री. योगीराज झावरे, सौ. शितल रांधवान, सौ. वृषाली मंचरे, श्री. नितीन धुमाळ, सौ. प्रियंका पवार, पत्रकार श्री. विनोद गायकवाड, मुख्याध्यापक श्री. राजेंद्र ठुबे, शिक्षक श्री. बाबाजी नवले, श्रीमती जयश्री गाडेकर, श्रीमती अलका भानगडे, श्रीमती लतीभाभी तांबोळी, श्रीमती सुचेता खिलारी, श्रीमती संध्या घोलप यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. प्रविण झावरे यांनी कुशलतेने केले.

अशा उत्साही कार्यक्रमांमुळे ग्रामीण भागात शिक्षणाची जाणीव वाढते आणि पालक-शिक्षक-समाज यांचे बंधन अधिक दृढ होते. टाकळी ढोकेश्वर शाळेचा हा प्रवेशोत्सव यंदा विशेष लक्षात राहील, असे सर्वांनी सांगितले. कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला.

दत्तात्रय गायकवाडांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश

खडकवाडी परिसरात पक्षाला नवे बळ

पारनेर : (स. गांवकरी)

बीतालुक्याच्या उत्तर भागातील आदिवासी समाजात मोठा जनसंपर्क असलेले एकलव्य युवा फाउंडेशनचे राज्य सचिव तसेच खडकवाडी ग्रामपंचायतीचे सदस्य दत्तात्रय गायकवाड यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षात जाहीर प्रवेश केला. पारनेर येथील खासदार नीलेश लंके यांच्या जनसंपर्क कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात खासदारांचे बंधू दीपक लंके यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश पार पडला.

दत्तात्रय गायकवाड हे गेल्या वीस वर्षांपासून खडकवाडी व उत्तर पारनेर भागात सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात सक्रिय आहेत. आदिवासी समाजासह सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने काम करणारे कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांच्या व्यापक जनसंपर्कामुळे आणि तळागाळातील कार्यामुळे उत्तर भागात त्यांचा प्रभावी संपर्क आहे.

शरद पवार यांच्या पुरोगामी विचारांनी तसेच खासदार नीलेश लंके यांच्या विकासाभिमुख कार्याने प्रेरित होऊन आपण राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्याचे गायकवाड यांनी यावेळी सांगितले. आदिवासी बांधव व सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न अधिक प्रभावीपणे मांडण्यासाठी आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी पक्षाच्या माध्यमातून कार्य करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. या पक्षप्रवेशासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटाचे प्रमुख अमोल उगले यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. तसेच नीलेश लंके प्रतिष्ठानचे पदाधिकारी संतोष शिंदे, गणेश आग्रे आणि राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे तालुका उपाध्यक्ष विशाल गागरे यांनी विशेष प्रयत्न केले.

यावेळी दीपक लंके आणि अमोल उगले यांनी दत्तात्रय गायकवाड यांचे पक्षात स्वागत करत त्यांच्या पुढील सामाजिक व राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या. गायकवाड यांच्या प्रवेशामुळे खडकवाडी व उत्तर पारनेर परिसरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद वाढणार असून आदिवासी समाजाच्या प्रश्नांना अधिक बळकटीने वाचा फुटेल, असा विश्वास उपस्थित पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमास जितेश सरडे, बाळासाहेब लंके, संदीप चौधरी, सरपंच अभिजीत झावरे, युवराज पाटील खिलारी यांच्यासह निलेश लंके प्रतिष्ठानचे पदाधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)